Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# अनुराधा पाटील यांची कविता स्त्रीवादी करूणेचा आत्मस्वर

**डॉ. पंडित रानमाळ**

१९८० नंतर लेखन करणाऱ्या कवयित्री म्हणून अनुराधा पाटील यांचा उल्लेख केला जातो. 'दिगंत', 'तरीही', 'दिवसेंदिवस', आणि 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' 'दरअस्सल', 'कदाचित अजूनही', 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती', इ. कवितासंग्रह २०२३ पर्यंत प्रकाशित झालेले आहेत.

कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितेत ग्रामीण जीवन, स्त्रीचे अनुभवविश्व, निसर्ग, मानवी नातेसंबंध, दुःख, एकाकीपणा आणि जगण्याचा संघर्ष अत्यंत संवेदनशीलतेने व्यक्त झाला आहे. त्यांच्या प्रमुख कवितासंग्रहातून वरील आशय व्यक्त होतो.

'दिगंत' हा पहिला कवितासंग्रह १९८१ मध्ये प्रसिद्ध झाला. जळगाव जिल्ह्यातील पहूरसारख्या लहान गावात सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या व रूढ अर्थाने फारसे शिक्षण न झालेल्या अनुराधा पाटील यांच्या कवितेच्या वैशिष्ट्यांमुळे अनेक पुरस्काराने त्या सन्मानित आहेत. 'दिगंत' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह होय. अल्पाक्षरी, लयबद्ध आणि प्रतिभेच्या गडद प्रभावाखाली स्वतःची जाण व्यक्त करणारी प्रेम आणि विनाशाची समंजस जाण व्यक्त करते. स्वतःचे जग शोधणारी, मातीच्या हातांना पेळणारी, धग सोसणारी, प्राणातून हिरवे रान अंकुरण्याची प्रार्थना करणारी, गाथेतून मनात उतरलेल्या माणसांबद्दल कणव दाखवणारी, मुखवटा स्वीकारतानाची घालमेल सांगणारी, पाऊस प्रतिमांमधून सृजन आणि विनाशाचं चक्र पेलणारी, आपल्या भ्रमांकडे अचंबित होऊन पाहणारी, वाहून जाणारे गाव असहाय्यपणे अनुभवणारी आणि हिरवी वस्ती नाहीशी झाल्याचे तीव्र दुःख करणारी ही कविता गाव उठून गेल्यानंतरच्या ओसाडीचे विदारक चित्र उभे करते. त्यांच्या कवितेत अनुभव व्यक्त करण्याची, जगण्याविषयी काही सांगणारे आविष्कार येतात. 'सतत चालतो आणि कुठेच पोहोचत नाही आपण', 'आता सोडून आलोय आपणच लाभलेले सोबतीचे सारे आधार/ पण तसे तर नेहमीच रस्ते वेगळे होते', 'सगळंच सोबत घेऊन/ चालता यावं असा वेडेपणा/ करता येत नाही/ आयुष्याबरोबर', यातून जगण्याचे अनुभव त्या व्यक्त करतात.

या कवितासंग्रहात रोमँटिकवृत्तीही व्यक्त होते. ग्रामीण जीवन, निसर्ग, माणसांच्या भावना आणि जीवनातील आशा-आकांक्षा यांचे चित्रण, नव्या कवयित्रीचा संवेदनशील काव्यस्वर या कवितेमध्ये दिसतो.

'तरीही' हा १९८५ मध्ये प्रसिद्ध झालेला दुसरा कवितासंग्रह. दुःख, संघर्ष आणि प्रतिकूल परिस्थितीतही जगण्याची जिद्द, स्त्रीमनातील वेदना आणि आशावाद या कवितासंग्रहातून कवयित्रीचे भावनानुकूल मन व्यक्त होते.

काळप्रवाहात आपल्यातला मरून गेलेला माणूस बघतानाची घालमेल आणि आपलेपणाच्या स्पर्शाची आस अशा विरोधी भावभावनांनी उत्कटतेने भिडणारी ही कविता कवितेतलं जगणं तेवढं खरं उरतं असं म्हणते. जमिनीतून एखादं झाड उखडून पडावं, प्रेमाची सावली देणारं झाड नसावं, गावसंस्कृती, गावाच्या विकासाच्या वाटा अंधारमय वाटाव्या आणि एखाद्या माहेरवाशीण स्त्रीला ते सोसण्याची ताकद उरू नये. तरीही तिला एक सृजनशील पदर सापडतो तो म्हणजे एक कवितेचा. हेच या कवितेचे मध्यवर्ती आशयकेंद्र होय.

'तरीही' या संग्रहात, स्त्रीच्या जगण्यातली स्थित्यंतरे कवयित्री व्यक्त करते. 'मी या गावात आले तेव्हा/ उगीच ओळखीच्या वाटऱ्या/ अनोळखी चेहऱ्यावर दिसावे ओलसर हसू/ तसं गाव हसत होतं/ मी गावाची झाले तेव्हा/ आभाळ नितळ आणि श्वास घेता यावेत/ एवढे दिवस मोकळे होते/ पण मग ओळखीचे झालेले नवे जग अनोळखी होत जाते/ इतरांच्या स्वप्नांमध्ये रंग भरता भरता/ आपली स्वप्न तशीच राहून जातात...' अशी भावव्याकूळता संवेदनशीलतेने कवयित्री व्यक्त करते.

'दिवसेंदिवस' हा कवितासंग्रह अनुराधा पाटील यांच्या प्रवासातील केंद्रबिंदू होय. या संग्रहापासून त्यांची कविता अधिक प्रगल्भ होत गेली आहे. या कवितेतून त्यांनी स्वतःचा आणि स्त्रीत्वाचा आदिम शोध घेताना स्वतःच्या कवितेचे एक वेगळे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निर्माण केले आहे. स्त्रीविषयीचे मूलगामी अनुभवचिंतन म्हणजेच अनुराधा पाटील यांची कविता होय.

'दिवसेंदिवस' या कवितासंग्रहातून अनुराधा पाटील यांच्या सर्जनशील स्त्रीवादी जाणिवांचा एक नवा आणि अधिक विकसित आविष्कार दिसून येतो; कारण या कवितेत आता अधिक लखपणे पोरी, घरातील बायका, वृद्धा आपापल्या आवाजानिशी वावरताना ऐकू येतात, दिसतात. 'वाचताच येत नाही अशा अक्षरांचा तू एक ग्रंथ आहेस आणि माझ्या याबिनसावलीच्या जगात / ईश्वरा / लागला आहेस आता तूही

देशोधडी / असे देवालाही बजावणारा हा आवाज तीव्र स्त्रीवादी जाणिवेने अधिक प्रखर बनला आहे. 'मला नको आहे' या कवितेतली आशा, प्रार्थना साऱ्या स्त्रियांच्या प्रतिनिधिक आहेत.

'मला नको आहे तुझं अबीरबुक्याच पंढरपूर
नको आहे ... मुक्तीचा श्रीरंगचकवा
वसव तुझ्या उदार हातांनी
निदान एखादा जन्मांत
उनाड होणारी घरंदारं
धावू दे दुडदुडत, कोवळे पाय
काळजात भरून वारं
खरी होऊ दे पोरीची स्वप्न ....
म्हणू दे दूरवर डोळे लावून
पिकल्या पानांना थकलेल्या आयुष्याचे
खिन्न अभंग...
पडक्या ओसरीत
येऊ दे
रानावनाचा पावसापाण्याचा
टाके घालून पुन्हा पुन्हा शिवलेल्या
जुन्या लुगड्याचा वास
माझ्याही विरत चाललेल्या
आयुष्याला----

आपलं घरदार, शेतीवाडी, म्हातारी आजी आणि माणसं यांच्या डोळ्यांमध्ये दाटलेली साध्या सुखाची आस त्यातून सजीव होते. स्त्रियांबरोबरचे मैत्र आणि सहवेदना हे या कवितासंग्रहाचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे.

'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' हा कवितासंग्रह स्त्रीवादी जाणिवांचे अधिक विकसित स्वरूप आहे. यातला स्वर हा माती आणि माणसांवर प्रेम करणाऱ्या स्त्रीचा, जगणाऱ्या जळत्या प्रश्नचिन्हांवर आपले थंड हात फिरवणाऱ्या जीवनदायिनीचा आहे. या संग्रहाची अर्पणपत्रिका सांगते.

‘ आईला
आणि माझ्या कवितेत
वावरणाऱ्या सगळ्या बायांना
मी तुमच्यातूनच आले,
मी तुमच्यातली एक होते,
हा धागाच मला आजही
तुमच्याशी बांधून ठेवतो.’

यातून कवयित्री आपली भूमिका मांडते. ग्रामीण जीवनातील स्त्रीचे विवाहपूर्व निरागस जगण्याचे आणि तिच्या विवाहोत्तर आयुष्यातल्या वेदनांचे, तिला जाणवणारे एकाकीपण, परकेपण आणि तिचे मौन यांची भावचित्रे कवयित्री त्यांच्या कवितेत मांडतात. त्यामुळे ग्रामीण स्त्रीच्या दुःखाशी नागरी स्त्रीचे दुःख एकरूप होते. त्यामुळे एकट्या कवयित्रीचे किंवा ग्रामीण स्त्रीचे ते दुःख राहत नाही तर त्या दुःखाला सार्वत्रिकता प्राप्त होते.

या संग्रहातल्या कवितेतून दिसणारी स्त्री लहान मुलीपासून वृद्धेपर्यंत सर्वदूर रूपाने समोर येते. ती लहान मुलगी, नवरी, गृहिणी, आई, मैत्रीण आणि बाजारातली क्रयवस्तू अशा अनेकविध रूपाने तर दिसतेच पण परंपरेने प्रस्थापित मराठी कवितेत सहसा न दिसणाऱ्या एका नव्या, स्त्रीकेंद्री परिवर्तनाच्या जाणिवांपेक्षा ही कविता आविष्कृत करते. हे या कवितेचे महत्त्वाचे लक्षण आहे.

बाईच्या वाट्याला आलेले दुःख व तिचे काहीच नसल्याचे अस्तित्वशून्य जगणं ही खंत या कवितेत व्यक्त होते. 'बाई तसं तर' या कवितेत

"बाई तसं तर
ना बाप घर आपलं

ना आप घर आपलं

पण सुरुवात तर झालेलीच असते

वेशीपर्यंत पोचवून

परत फिरलेले असतात सुहृद

आणि ही काशीची वाट

तशी एकटीचीच"

अशा कवितेतून बाईचे अस्तित्व तिची वाट ही एकटीचीच असते. स्वातंत्र्य असलंच तर ते फक्त आपापल्या अंगणात वाळू घातलेले दाणे टिपण्या पुरतेच. जगण्याचं ताक फुंकून प्यायला लागणं हे साऱ्या स्त्रियांचे आयुष्य. याचप्रमाणे 'किती वर्षात' याही कवितेत सभोवतालच्या वास्तवाचे अंगावर शहारे आणणारे चित्रण आहे. या माणसांच्या जगात अनेक स्त्रियांचे बळी जातात. गर्दीत गुदमरणारी लहान मुलं, आत्महत्या करणारे शेतकरी, जाळल्या जाणाऱ्या सुना, बलात्काराची जळती मोहर कपाळावर उठलेल्या मुलींचे जगणे हे भयानक वास्तव या कवितेतून कवयित्री मांडते.

'तसं इकडेही काही

खूप बरं नाही

माणसांच्या या अभयारण्यात

कुठच जीवाला धर नाही

रस्ते गर्दी मोर्चे

गर्दीत गुदमरणारी मुलं

वाहिनी फुटलेली

धरण ही आटलेली

जाळल्या जाणाऱ्या सुना

आणि बलात्काराची

जळती मोहर

कपाळावर उमटलेल्या मुली

इथ उगवतो रोज'

संपूर्ण नवा दिवस

आणि वाढतच जातं

आपल्यात आणि इतरात

मैलाचं अंतर'

कवयित्री या कवितेत पत्रात माहेर व सासर या दोन्हीकडील परिस्थिती स्त्रीयांची वेदनेची, दुःखाचीच आहे. हे भयानक वास्तव मांडते.

'कदाचित अजूनही' हा सन २०१७ मध्ये प्रकाशित झालेला अनुराधा पाटील यांचा कवितासंग्रह होय. २०१९ ला साहित्य अकादमी पुरस्कार या संग्रहाला मिळाला आहे. या कविता संग्रहातून मानवी जीवनातील दुःख, आशा, स्त्रीचे अस्तित्व, नातेसंबंध, मृत्यू, निसर्ग आणि बदलत्या समाजजीवनाचा संवेदनशील वेध घेतो. कवयित्री वैयक्तिक अनुभवातून मानवी अनुभव व्यक्त करतात.

'कदाचित अजूनही' हा एक स्त्री करुणेचाच प्रदीर्घ संवाद आहे. किंबहुना स्त्रीच्या आंतरिक चरित्राचे हे चित्रण आहे. एकावन्न कवितांमधील बहुतांशी कविता स्त्री जीवनानुभावाचे पदर या कवितांमधून येतात. या कवितेतले स्त्रीचे अस्तित्व सुटे किंवा अगदीच स्वतंत्र नाही. तिचे आयुष्य हे दुःखाने भरलेले आहे. त्याचे मूळ कारण कुटुंबव्यवस्था होय. या व्यवस्थेत ती मुलगी, आई, बहीण, प्रेयसी, सून या अनेक नात्यांशी तिला जगाव लागते. त्यामुळे हे नातं सांभाळताना तिचा अनेक दुःखाला सामोरे जावे लागते. थोडक्यात सामान्य माणसाची विशेषतः स्त्रियांची असहायता, असुरक्षितता आणि तिच्या अस्तित्वाच्या प्रश्नावर ही कविता अत्यंत भावनामय चित्रण करते.

'तुझा सूर्य उगवतो / तुझा चंद्र उगवतो

काळाच्या ठिकऱ्या उडवून / भाजली जाते देहाची माती

पुरे होतात / सुपातून जात्यात नित्य येरझारा

मग कुठ ठेवावा / हा उजेड आणि अंधार

त्वचेखाली पसरणारा'

यासारख्या कवितेतून स्त्रीजीवनाची शोकमय अवस्था व्यक्त होते. या सारांशामध्ये हा संग्रह निराशेच्या अंधारातही आशेचा एक किरण शोधणारा आहे. मानवी मूल्ये, स्त्रीचे माणूसपण आणि संवेदनशिलतेचा आग्रह धरणाऱ्या या कविता वाचकाला अंतर्मुख करतात.

अनुराधा पाटील यांच्या संपूर्ण कवितेत स्त्रीवादी जाणिवांच्या विकासाचा एक सर्जनशील पट समोर येतो. त्यांची कविता सत्तरीनंतरच्या दशकातील स्त्रीच्या जगण्याचा आत्मशोध व्यक्त करते. शेवटी एका स्त्रीचा हा आत्मशोध संबंध स्त्रियांचे सार्वत्रिक रूप व्यक्त करतो. तिचे शोषित जीवन, पुरुषसत्ताक व्यवस्थेने केलेला कोंडमारा, त्यातून आलेले एकाकीपण, भय, असुरक्षितता, हिंसाचार, मुकेपण, हतबलता इत्यादींचा अनुभव व्यक्त होतो. कवयित्री स्वतःचे जगणे व इतर स्त्रियांचे जगणे यात साधर्म्य मांडते. इतर स्त्रियांचे उपेक्षित जगणे, दुःख एकमताने त्यांच्याशी करुणेचा भावस्वर एकजिवत्व शोधते. आपली व्यक्तिगतता जपत दुःखाची पाळेमुळे शोधत जाणारी ही कविता मग सार्वत्रिक दुःखाचे उद्गार आविष्कृत करते. त्यांच्या कवितेतील सांस्कृतिक विरोध येतो. हा विरोध संयत, सुजाण व समंजस असला तरी तीव्र आहे. स्त्री म्हणून समाजात जगण्याचा आत्मशोध हा स्वतःचा व इतर स्त्रियांचा समाज यांच्या नात्याचाही भाग आहे व तो कवयित्रीच्या कवितेच्या प्रत्येक स्पंदनातून विकसित होत जातो.

**संदर्भ ग्रंथ –**

१) 'दिगंत'-अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद (१९९०)

२) तरीही- अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद (१९८५)

३) दिवसेंदिवस- अनुराधा पाटील, कुशा प्रकाशन, औरंगाबाद (१९९२)

४) वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ- अनुराधा पाटील, तुला प्रकाशन, औरंगाबाद, जाने, २००५

५) मराठवाडा साहित्य परिषद — प्रतिष्ठान, अंक २०१४, औरंगाबाद.